मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स

मराठी दैनिक

'भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

Register No. : RNI - MAHMAR /2012/44621 ■ मुंबई ■ अंक : १४३ ■ वर्ष :१२

Web Site : www.theglobaltime.com ■ मंगळवार दि. ४ जून २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹३.००

# प्रा. सलमा नदाफ - मुल्ला यांना पीएच डी पदवी प्रदान



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज येथील प्रा. सलमा नदाफ - मुल्ला यांना शिवाजी विद्यापीठकडून नुकतीच जीवरसायनशास्त्र विषयात पीएच डी पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी 'एक्सप्लोरींग फार्माकोलॉजीकल प्रॉपर्टीज ऑफ ग्लुटामीनेज फ्रॉम हॅलॉफिलिक बॅक्टोरिया' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. शिवाजी विद्यापीठातील डॉ. पी. बी. दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आपले संशोधन कार्य पूर्ण केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग तसेच विवेकानंद कॉलेजमधील प्राध्यापक व सर्व सहकाऱ्यांनी प्रा. सलमा नदाफ - मुल्ला यांचे अभिनंदन केले आहे.

04/06/24

■ सोमवार दि. १० जून २०२४
■ पाने : ०८ ■ किंमत : ₹३.००
Web : www.theglobaltime.com
Register No. RNI - MAHMAR /2012/44821
मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत
■ मराठी दैनिक
भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब
द ग्लोबल टाइम्स



# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखेंनी महाराष्ट्राला वैचारिक वळण दिले

## ■ मुख्याध्यापक दत्तात्रय वारे (गुरुजी) यांचे प्रतिपादन
## ■ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०६वी जयंती साजरी

*कोल्हापूर : स्वाभिमान हा माणसाला संघर्षातून व सत्कर्मातून मिळत असतो. मन, बुद्धी आणि शरीर एकत्र आल्याशिवाय प्रभावी शिक्षण होत नाही. शिक्षकांनी अध्यापनात प्रयोगशीलता जपली पाहिजे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वारसा मोठा आहे. महाराष्ट्राला वैचारिक वळण देण्याचे काम शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने केले आहे. बापूजींचा विचार शिक्षकांनी अध्यापनात उतरवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय शाळा, वाबळेवाडीचे जनक आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जालिंदरनगर (ता. खेड, जि. पुणे) चे मुख्याध्यापक दत्तात्रय वारे (गुरुजी) यांनी केले.*



कोणत्याही राष्ट्राचे भविष्य हे शैक्षणिक विचारावर अवलंबून असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विचारांची प्रक्रिया शिक्षणातून उभी राहत असते. प्रत्येक कालखंडात व्यक्तिमत्वे एक शिक्षक असते. त्यामुळे शिक्षकांनी आपली कर्तव्ये जपली पाहिजेत. नवीन शैक्षणिक धोरणाची योग्य अंमलबजावणी केल्यास कौशल्याधारित विद्यार्थी घडविता येतो. नवीन शैक्षणिक धोरणात सर्वांना शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, गुणवत्तापूर्ण, परवडणारे शिक्षण आणि समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना या गोष्टी महत्त्वाच्या असतात. शिक्षकाने वेळापत्रकात न अडकता सदैव विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तत्पर असायला हवे.

ते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंती प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकाची भूमिका या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते. यावेळी संस्था उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्था सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, संस्था सहसचिव (अर्थ) एस. एम. गवळी, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, कोल्हापूर जिल्हा विभाग प्रमुख शिवाजी साळुंखे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

दत्तात्रय वारे म्हणाले की, कोणत्याही राष्ट्राचे भविष्य हे शैक्षणिक विचारावर अवलंबून असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विचारांची प्रक्रिया शिक्षणातून उभी राहत असते. प्रत्येक कालखंडात व्यक्तिमत्वे एक शिक्षक असते. त्यामुळे शिक्षकांनी आपली कर्तव्ये जपली पाहिजेत. नवीन शैक्षणिक धोरणाची योग्य अंमलबजावणी केल्यास कौशल्याधारित विद्यार्थी घडविता येतो. नवीन शैक्षणिक धोरणात सर्वांना शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, गुणवत्तापूर्ण, परवडणारे शिक्षण आणि समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना या गोष्टी महत्त्वाच्या असतात. शिक्षकाने वेळापत्रकात न अडकता सदैव विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तत्पर असायला हवे.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले की, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. शिक्षणातील संधी आणि आव्हाने ओळखून बापूजींनी कार्य केले. या शिक्षणयुगात बापूजींनी अथकपणाने कार्य केले. विद्यार्थ्यांना घडविणे हे प्रत्येक शिक्षकाचे उद्दिष्ट असायला हवे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे शिक्षकांनी सदैव लक्ष असले पाहिजे. यावेळी मान्यवरांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मधुरा शिंगटे व सहकाऱ्यांनी संस्था प्रार्थना व सुमधुर भक्तिगीत सादर केली. प्रास्ताविक संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी केले. पाहुण्यांची ओळख संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी करून दिली. आभार संस्थेचे सहसचिव (अर्थ) एस. एम. गवळी यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. कविता तिवडे व प्रा. गीतांजली साळुंखे यांनी केले. दुसऱ्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्र संपन्न झाले.

10/06/24

Hello Prabhat 21-06-2024



# डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरिंगचा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

कोल्हापूर : हॅलो प्रभात

डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न झाला.यावेळी विद्यार्थी जीवन पुन्हा अनुभवल्याचा आनंद माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून आला. स्मृतीचिन्ह देऊन या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला, तसेच सर्वांनी एकत्रितपणे स्नेहभोजनाचा आनंद घेतला. जुन्या आठवणींना पुनश्च एकदा उजाळा मिळाला.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. डॉ.बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूटचे प्राचार्य विरेन भिर्डी यांनी प्रास्ताविकामध्ये इन्स्टिट्यूटचा गौरवशाली प्रवास विस्तृतपणे सादर केला.प्राचार्य साळुंखे यांनी मनोगत व्यक्त करताना,माजी विद्यार्थी हा संस्थेचा एक महत्त्वपूर्ण घटक असून नवीन पिढ्यांना मार्गदर्शनासाठी नेहमी उपलब्ध असणारा एक स्रोत असतो. संस्था आणि माजी विद्यार्थी यांच्या समन्वयातून विविध प्रकारची प्रगती साधता येते. त्यामुळे हा अनुबंध नेहमी वृद्धिंगतच राहिला पाहिजे. व्यावसायिक जीवनामध्ये माणूसपण विसरू न देता संवेदनशील अंत:करणाने जीवनाची उन्नत अवस्था प्राप्त करा, असे प्रतिपादन केले.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी याप्रसंगी बोलताना, माजी विद्यार्थ्यांची संस्थेप्रति असणारी बांधीलकी संस्था आणि विद्यार्थी या दोघांसाठीही संधींची नवीन दालने उघडीत असते. संस्था आणि आजी माजी विद्यार्थी यांच्या एकत्रित प्रयत्नातून समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये नेतृत्व तयार होते. जॉब सिकर होण्यापेक्षा जॉब गिव्हर होणे अत्यंत आवश्यक आहे.

या कार्यक्रमासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगीताई गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते.

हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'चे एम.एच.टी. सीईटी परीक्षेत घवघवीत यश

कोल्हापूर : हॅलो प्रभात

एम.एच.टी. सीईटी परीक्षेमध्ये विवेकानंद कॉलेजने अपूर्व यश संपादन केले. विवेकानंद कॉलेजचे तब्बल ४०० पेक्षा अधिक विद्यार्थी अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र, कृषी अभ्यासक्रमासाठी पात्र ठरले. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा एम.एच.टी. सीईटी २०२४ च्या निकालात मध्ये : अथर्व महेश करंबळी - ९८.४४, श्रध्दा भारत कुंभार - ९८.३३, ओंम रमेश माने - ९८.०५ ,अल्तमाश मुश्ताक उस्ताद -९७.५०, आदित्य आनंद कालेल -९७.४४ पर्सेंटाइल गुण संपादन करुन यशस्वी ठरले.पीसीबी ग्रूप मध्ये : आदिती बाबासो पाटील- ९९.०३, सानिया अनिल लोहार - ९८.८०, देवेंद्र राजेंद्र गायकवाड - ९८.३८, प्रणिल प्रशांत हेबाळे - ९७.८०, शौमिका दत्तात्रय चव्हाण - ९६.१४ पर्सेंटाइल गुण संपादन करुन यशस्वी ठरले. एकूण ७० विदयार्थ्यांनी ९० पर्सेंटाइल पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

या विद्यार्थ्यांना प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, सी.ई. ओ. श्री.कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार श्री.आर.बी.जोग यांनी यशस्वी विदयार्थ्यांचे अभिनंदन

केले.या यशवंत गुणवंत विदयार्थ्यांना विज्ञान विभाग प्रमुख प्रा एम.ए.कुरणे, प्रा.गीतांजली

साळुंखे डॉ.अश्विनी पाटील, प्रा.के.जे.शिंदे, प्रा.एन. एन.हिटणीकर, डॉ.एल.ई. नरोन्हा, डॉ.सौ.एम.बी. साळुंखे, आणि सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले

erelego.com

Hell Prabhat 21-6-2024

22/06/2024
PE 22/6/24



# सायली पाटील बनली सहायक अभियंता

किणी : किणी (ता. हातकणंगले) सायली धन्यकुमार पाटील हिची राज्य शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या निवड परीक्षेतून जलसंपदा विभागात सहायक अभियंतापदी निवड झाली. तिचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले असून प्राथमिक शिक्षण कन्या विद्या मंदिर, माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूल, उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व पदवीचे सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून पूर्ण केले आहे. तिला शिक्षकासह, आई, वडील, पती सासू व आजी, आजोबा व कुटुंबीयांचे प्रोत्साहन लाभले.



लोकमत
शनिवार ८.६.२०२४

# बापूजी साळुंखे जयंतीनिमित्त कार्यक्रम

कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६व्या जयंतीनिमित्त रविवारी (दि. ९) विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सकाळी १०:३० वाजता दत्तात्रय वारे यांचे 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे असतील. दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्र आयोजित केले आहे. या कार्यक्रमासाठी संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी व संस्थेच्या १३ जिल्ह्यांतील ४०७ शाखांमधील शिक्षक उपस्थित राहणार आहेत.

लोकमत
कोल्हापूर, सोमवार, १० जून २०२४

# शिक्षकांनी वेळापत्रकातच अडकू नये

## दत्तात्रय वारे : डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नवीन शैक्षणिक धोरणात सर्वांना शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, गुणवत्तापूर्ण, परवडणारे शिक्षण आणि समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यामळे शिक्षकांनी वेळापत्रकात न अडकता सदैव विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी तत्पर असायला हवे, असे मत वाबळेवाडी शाळेचे जनक, प्रयोगशील शिक्षक दत्तात्रय वारे यांनी रविवारी व्यक्त केले.

कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्यावतीने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

वारे म्हणाले, स्वाभिमान हा माणसाला संघर्षातून व सत्कर्मातून मिळत असतो. मन, बुद्धी आणि शरीर एकत्र आल्याशिवाय प्रभावी शिक्षण होत नाही. शिक्षकांनी अध्यापनात प्रयोगशीलता जपली पाहिजे.



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात दत्तात्रय वारे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. आर. व्ही. शेजवळ, शुभांगी गावडे, नामदेवराव कांबळे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, एस. एम. गवळी, कौस्तुभ गावडे, श्रीराम साळुंखे उपस्थित होते.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वारसा मोठा आहे. महाराष्ट्राला वैचारिक वळण देण्याचे काम डॉ. बापूजी साळुंखे आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने केले आहे. बापूजींचा विचार शिक्षकांनी अध्यापनात उतरवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. यावेळी संस्था उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, एस. एम. गवळी, कौस्तुभ गावडे, श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख उपस्थित होते. अभयकुमार साळुंखे म्हणाले, विद्यार्थ्याला घडविणे हे प्रत्येक शिक्षकाचे उद्दिष्ट असायला हवे. यावेळी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. महेश हिरेमठ व सहकाऱ्यांनी संस्था प्रार्थना व भक्तिगीते सादर केली. प्रा. डॉ. कविता तिवडे व प्रा. गीतांजली साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. एस. एम. गवळी यांनी आभार मानले. दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्र झाले.

10/06/24
10-4-2024

पुण्य नगरी
शुक्रवार, ७ जून २०२४

# विवेकानंद कॉलेजचे नीट परीक्षेत यश

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजने नीट परीक्षेमध्ये यश मिळवले. या परीक्षेत प्राजक्ता तळप ही ६७६ गुण प्राप्त करून कॉलेजमध्ये प्रथम आली. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन केले. याशिवाय सई पाटील, सानिका साळोखे, विभावरी पाटील, साक्षी तुपे, देवराज देसाई, स्वरांजली साळवी, समिधा डवरी, राहुल केदार यांनी ५०० पेक्षा जास्त गुण मिळवले. या विद्यार्थ्यांना विज्ञान विभागप्रमुख प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. जी. एस. साळुंखे, प्रा. एम. आर. नवले, प्रा. एस. एन. साळुंखे, प्रा. के. जे. गुजर, प्रा. एम. आर. काळेबाग आदींचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी

■ शनिवार, २२ जून २०२४

# योगामुळे सदृढ शरीरासह परिपक्व मन : डॉ. कुंभार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एकविसाव्या शतकात भारतीय संस्कृती आणि विचार जगाला दिशा देणारे आहेत. योग आणि ध्यानधारणा याद्वारे दैनंदिन जीवनातील ताणतणाव कमी करून ध्येय साध्य करता येते. योगामुळे आपणास सदृढ शरीरासोबत परिपक्व मनाची निर्मिती करता येते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात बोलत होते.

महिला सक्षमीकरणासाठी योग हा कार्यक्रम योग गुरू विलास गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी ६ महाराष्ट्र एनसीसी गर्ल्स बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, ५ महाराष्ट्र एनसीसीचे मानस दीक्षित, सुहास काळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन कॅप्टन सुनीता भोसले, एनएसएसप्रमुख प्रा. संदीप पाटील यांनी केले. डॉ. राजश्री पाटील, प्रा. यू. आर. हिरकुडे, प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. रविराज सुतार उपस्थित होते.

प्रास्ताविक लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. आभार प्रा. बागडी यांनी मानले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, रजिस्टार रघुनाथ जोग यांचे सहकार्य लाभले.

पुण्य नगरी | सोमवार, १० जून २०२४

# डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्राला वैचारिक वळण दिले

## दत्तात्रय वारे : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०६ वी जयंती उत्साहात



कोल्हापूर : 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर बोलताना प्रमुख पाहुणे दत्तात्रय घारे. व्यासपीठावर कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे आदी.

**कोल्हापूर :** कोणत्याही राष्ट्राचे भविष्य हे शैक्षणिक विचारावर अवलंबून असते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वारसा मोठा आहे. महाराष्ट्राला वैचारिक वळण देण्याचे काम शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने केले. बापूजींचा विचार शिक्षकांनी अध्यापनात उतरवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा, वाबळेवाडीचे जनक आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जालिंदरनगर, ता. खेड, जि. पुणेचे मुख्याध्यापक दत्तात्रय वारे यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

वारे म्हणाले, प्रत्येक कर्तृत्ववान व्यक्तीमागे एक शिक्षक असतो. त्यामुळे शिक्षकांनी आपली कर्तव्ये जपली पाहिजेत. शिक्षकाने वेळापत्रकात न अडकता सदैव विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी तत्पर असायला हवे.

अध्यक्षीय भाषणात कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. शिक्षणातील संधी आणि आव्हाने ओळखून बापूजींनी कार्य केले. या शिक्षणयज्ञात बापूजींनी अव्याहतपणे कार्य केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. महेश हिरेमठ व सहकाऱ्यांनी संस्था प्रार्थना व भक्तीगीते सादर केली. यावेळी संस्था उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, जिल्हा विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी केले. पाहुण्यांची ओळख संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी करुन दिली. आभार संस्थेचे सहसचिव (अर्थ) एस. एम. गवळी यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. कविता तिवडे व प्रा. गीतांजली साळुंखे यांनी केले.

पुण्य नगरी
सोमवार, २४ जून २०२४

# अभिजित खोत यांची निवड



**कोल्हापूर :** येथील अभिजित बंडोपंत खोत यांची शासनाच्या अन्नपुरवठा निरीक्षकपदी निवड करण्यात आली आहे. नुकत्याच घेण्यात आलेल्या या पदाच्या परीक्षेत त्यांनी राज्यात ६ वा क्रमांक पटकावला. खोत यांचे शालेय शिक्षण खटाव येथे झाले, तर उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद कॉलेज येथे झाले.

24/06/24

24.06.24

पुण्य नगरी
शुक्रवार, २८ जून २०२४

# 'विवेकानंद'मध्ये एनसीसी छात्रांचा सत्कार

**कोल्हापूर** : विवेकानंद महाविद्यालय व ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन येथील ऑफिसर छात्र श्रेया देसाई हिची नौदल सेनेमध्ये ऑफिसर ट्रेनिंगसाठी निवड झाली. तसेच ज्युनिअर अंडर ऑफिसर शरयू सुतार, कॉर्पोरल ऐश्वर्या पवार व कार्पोरल सहिता बारसकर यांना कॅडेट वेल्फेअर स्कॉलरशिप मिळाली. त्याबद्दल प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. श्री विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन केले. या छात्रांना लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, कॅप्टन सुनीता भोसले यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

28/06/2024
28/06/2024

# ... अन् डॉ. चव्हाण एकटेच घराबाहेर पडले

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. व्ही. एम. चव्हाण सोमवारी दुपारी दोनच्या सुमारास स्टेट बँकेत कामानिमित्त जात असताना त्यांच्याबरोबर पत्नी सुनीता जाणार होत्या. परंतु, काही कामानिमित्त त्या घरीच राहिल्या. अपघातात डॉ. चव्हाण यांचा मृत्यू झाला. मात्र, त्या घरी राहिल्याने बचावल्या, असे कुटुंबातील सदस्याने सांगितले.

डॉ. चव्हाण हे मूळचे बोरवडे (ता. कागल) येथील रहिवाशी. वडील शासकीय सेवेत ड्रायव्हर होते. घरची परिस्थिती नसल्याने बी.कॉम.ला असताना अलोरे (ता. चिपळूण) येथे टेलिफोन ऑपरेटर म्हणून काम सुरू केले. पुणे येथे नोकरी केली. त्यानंतर लालबहादूर शास्त्री कॉलेज सातारा, काकासाहेब पाटील कॉलेज तळमावले (ता. फलटण) येथे प्राध्यापक व कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयात काम केले. मिरजेच्या वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च येथे प्राचार्य म्हणून कार्यरत होते. १९९९ पर्यंत भारती विद्यापीठ कदमवाडी येथे संचालक राहिले. १९९९ ते २००१ या काळात दिल्ली येथे होते. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू म्हणून त्यांनी काम पाहिले. निवृत्तीनंतर पुन्हा भारती विद्यापीठात सेवा बजावली.

डॉ. चव्हाण यांना शुगर व बी.पी.चा त्रास होता. काही दिवसांपूर्वी घरात झालेल्या किरकोळ अपघातात त्यांच्या डोक्याला मार लागला होता. त्यांनी रस्त्यावरून जाताना कधीही ४० स्पीडच्या पुढे वाहन चालवले नसल्याचे नातेवाईकांनी सांगितले. डॉ. चव्हाण सध्या विद्यापीठ परिसरात पत्नी सुनीता व अवधूत यांच्यासमवेत राहत होते. त्यांची मुलगी पल्लवी ऑस्ट्रेलिया, तर प्राजक्ता ही अमेरिकेत स्थायिक आहेत. डॉ. चव्हाण यांच्या अपघाती मृत्यूने शिवाजी विद्यापीठासह शैक्षणिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

06/2024
Thorat
10-4-2024

पुढारी
शनिवार, ८ जून २०२४

# डॉ. बापूजी साळुंखे जयंतीनिमित्त उद्या विविध कार्यक्रमांचे आयोजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची रविवार, दि. ९ जून रोजी १०६ वी जयंती आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे रविवारी सकाळी १०.३० वाजता 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जालिंदरनगरचे (ता. खेड, जि. पुणे) मुख्याध्यापक दत्तात्रय वारे यांचे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे असणार आहेत. संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी व संस्थेच्या १३ जिल्ह्यांतील ४०७ शाखांमधील शिक्षक, विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ८ जून २०२४

# प्रा. सलमा नदाफ-मुल्ला यांना पीएच.डी.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील प्रा. सलमा नदाफ-मुल्ला यांना शिवाजी विद्यापीठाने नुकतीच जीवरसायनशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी प्रदान केली. त्यांनी 'एकसप्लोरिंग फार्माकोलॉजीकल प्रॉपर्टीज ऑफ ग्लुटामीनेज फ्रॉम हॅलॉफिलिक बॅक्टोरिया' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. शिवाजी विद्यापीठातील डॉ. पी. बी. दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन केले.

पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, ११ जून २०२४

# शैक्षणिक विचारांवर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून

## दत्तात्रय वारे यांचे प्रतिपादन; डॉ. बापूजी साळुंखे जयंती कार्यक्रम



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंती कार्यक्रमात बोलताना मुख्याध्यापक दत्तात्रय वारे. सोबत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्राचे भविष्य हे शैक्षणिक विचारावर अवलंबून असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विचारांची प्रक्रिया शिक्षणातून उभी राहते. प्रत्येक कर्तृत्ववान व्यक्तीमागे एक शिक्षक असतो. त्यामुळे शिक्षकांनी आपली कर्तव्ये जपली पाहिजेत, असे प्रतिपादन अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा वाबळेवाडीचे जनक मुख्याध्यापक दत्तात्रय वारे गुरुजी यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. दत्तात्रय वारे गुरुजी म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाची योग्य अंमलबजावणी केल्यास कौशल्याधारित विद्यार्थी घडविता येतो. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वारसा मोठा आहे. महाराष्ट्राला वैचारिक वळण देण्याचे काम डॉ. बापूजी साळुंखे आणि स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने केले आहे. बापूजींचा विचार शिक्षकांनी अध्यापनात उतरवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अध्यक्षीय भाषणात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणातील संधी आणि आव्हाने ओळखून बापूजींनी कार्य केले. या शिक्षणयज्ञात बापूजींनी अव्याहतपणे कार्य केले. विद्यार्थ्याला घडविणे हे प्रत्येक शिक्षकाचे उद्दिष्ट्य असायला हवे. यावेळी संस्था उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, एस. एम. गवळी, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, २८ जून २०२४

**विवेकानंद कॉलेज**

येथे कराड येथील प्रा. डॉ. ए. जी. थोरात यांचे 'राजर्षी शाहूंचे विचार' या विषयावर व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन झाले. व्याख्यान, वृक्षारोपण करण्यात आले. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. समीक्षा फराकटे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अस्मिता तपासे यांनी आभार मानले. डॉ. श्रुती जोशी, प्रबंधक आर. बी. जोग उपस्थित होते.

**दादासाहेब मगदूम हायस्कूल**

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ६ जून २०२४

# 'विवेकानंद'मध्ये रविवारी शैक्षणिक धोरणांवर व्याख्यान

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०६ वी जयंती रविवारी (ता. ९) सकाळी १०.३० वाजता विवेकानंद महाविद्यालयाच्या डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे होत आहे. यावेळी मुख्याध्यापक दत्तात्रय वारे यांचे 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका,' यावर व्याख्यान होणार आहे. संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, संस्थेच्या १३ जिल्ह्यांतील ४०७ शाखांमधून गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्राचे आयोजन केले आहे. कार्यक्रमासाठी शिक्षणप्रेमी, अभ्यासक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

सकाळ
सोमवार, १० जून २०२४



**कोल्हापूर** : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानात बोलताना दत्तात्रय वारे. शेजारी प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, प्राचार्या शुभांगी गावडे, नामदेव कांबळे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे आदी.

# बापूजी साळुंखे यांनी राज्याला वैचारिक वळण दिले

## दत्तात्रय वारे; जयंतीनिमित्त व्याख्यान

कोल्हापूर, ता. ९ : शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वारसा मोठा आहे. महाराष्ट्राला वैचारिक वळण देण्याचे काम बापूजी आणि स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने केले, असे वाबळेवाडी (पुणे) येथील अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळेचे जनक दत्तात्रय वारे यांनी सांगितले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर ते आज बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

वारे म्हणाले, 'कोणत्याही राष्ट्राचे भविष्य हे शैक्षणिक विचारांवर अवलंबून असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विचारांची प्रक्रिया शिक्षणातून उभी राहते. प्रत्येक कर्तृत्वावान व्यक्तीच्या मागे एक शिक्षक असतो. त्यामुळे शिक्षकांनी कर्तव्ये जपली पाहिजेत. नवीन शैक्षणिक धोरणांची योग्य अंमलबजावणी केल्यास कौशल्याधारित विद्यार्थी घडविता येतो. शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे विचार शिक्षकांनी अध्यापनात उतरवणे ही त्यांना खरी आदरांजली ठरेल.'

प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, 'बापूजींच्या विचार व कार्याचा वारसा आत्मसात करून विद्यार्थी घडवावेत व संस्थेचा नावलौकीक वाढवावा.' दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्र झाले. यावेळी संस्था सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, उपाध्यक्ष नामदेव कांबळे, श्रीराम साळुंखे, हितेंद्र साळुंखे आदी उपस्थित होते. सहसचिव प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी प्रास्ताविक केले. मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी परिचय करून दिला. सहसचिव एस. एम. गवळी यांनी आभार मानले.

10/06/2024

दै. सकाळ
दि. 10/06/2024

# डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिवादन

**कोल्हापूर :** जुना बुधवार पेठ येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम झाला. संस्थेचे आजीवसेवक श्रीराम साळुंखे, मुख्याध्यापक जे. आर. जोशी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले. जे. आर. जोशी यांनी डॉ. साळुंखे यांच्या याविषयी माहिती सांगितली. तसेच साळुंखे यांनी डॉ. साळुंखे यांनी संस्था उभारणीसाठी दिलेल्या योगदानाविषयी माहिती दिली. विद्या पाटील, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला जाधव, पर्यवेक्षक बी. जे. सावंत, सांस्कृतिक विभागप्रमुख डी. व्ही. वाडीकर, विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी, उपस्थित होते. ए. के. कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. एस. आय. चौगुले यांनी आभार मानले.